प्रेस नोट दि.२४/११/२०२३

प्रादेशिक परिवहन कार्यालय, कळंबोली कार्यालयाचे बाहेरील खाजगी आरटीओ एजंट भुषण यशवंत कदम यांना अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने लाच स्विकारतांना ताब्यात घेतलेबाबत.

| | | |
|---|---|---|
| अँन्टी करप्शन ब्युरो/घटक | :- | ठाणे |
| गुन्हा नोंद कमांक | :- | कळंबोली पो.स्टे. नवी मुंबई |
| खाजगी आरटीओ एजंट यांचे नांव | :- | भुषण यशवंत कदम, वय-२९ वर्षे, व्यवसाय-आर.टी.ओ.एजंट (खाजगी इसम), राहणार- चिंद्रण, पो.देवीचा पाडा, ता. पनवेल, जि. रायगड |
| मागितलेली लाचेची रक्कम | :- | २,५००/-रू. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :- | १,५००/-रू |
| थोडक्यात हकीगत | :- | यातील तक्रारदार यांनी दि. २१/११/२०२३ अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात प्रादेशिक परिवहन कार्यालय, कळंबोली कार्यालयाचे बाहेरील खाजगी आरटीओ एजंट भुषण कदम हे दुचाकी वाहन परवाना काढुन देण्याकरीता २,५००/- रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दि.२४/११/२०२३ रोजी पंच साक्षीदार यांचेसमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान खाजगी आरटीओ एजंट भुषण कदम यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे लगत असलेल्या आरटीओ कार्यालयातील संबधीत अधिकारी यांचा प्रभावी ओळख असल्याचे भासवून तक्रारदार यांचे दुचाकी लर्निंग लायसन्स करीता शासकीय फी २००/- रू. व पक्के लायसन्स करीता शासकिय शुल्क ९००/- रू असे एकत्रीत ११००/- शुल्क असतांना, तक्रारदार यांचे लर्निंग व पक्के लायसन्स काढुन देणेकरीता २,५००/- रू.लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्याअनुषंगाने केलेल्या सापळा कारवाई दरम्यान खाजगी आरटीओ एजंट भुषण कदम यांनी पहिला हप्ता म्हणुन १,५००/- रू. स्विकारले असतांना त्यांना, प्रादेशिक परीवहन कार्यालय, कळंबोली कार्यालय लगत असलेल्या गाळा क्र ४ या ठिकाणी दिनांक २४/११/२०२३ रोजी १५:२३ वा. रंगेहाथ पकडण्यात आले असुन त्याचेकडुन लाचेची रक्कम १,५००/- रू हस्तगत करण्यात आली आहे. त्यांच्याविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी-मा.श्री.सुनिल लोखंडे सो, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :- लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :- acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई-मेल आयडी :- spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :- acbmaharashtra.net
५) टोलफ्री क्र. :- १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :-०२२-२०८१३५९९

( हणमंत क्षिरसागर )
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

Scanned with CamScanner